सन २०२६-२७ करीता १% मुद्रांक शुल्क अधिभारामुळे जमा होणाऱ्या रकमा संबंधित महानगरपालिकांना वितरीत करण्याबाबत. रु.४२१,७०,००,०००/- लेखाशिर्ष (३६०४ ०९२४)

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४१/नवि-३२,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२
दिनांक: ०६ नोव्हेंबर, २०२६.

संदर्भ :-

(१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक-अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/ अर्थ-३, दि.०९ एप्रिल, २०२६.
(२) शासन निर्णय, नगरविकास विभाग, क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४१/नवि-३२, दि. २९ जून,२०२६
(३) शासन निर्णय, नगरविकास विभाग, क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४१/नवि-३२, दि. २९ सप्टेंबर, २०२६

प्रस्तावना :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याच्या कलम १४९ अ मध्ये सुधारणा करण्यात आली असून यामध्ये महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०), याअन्वये स्थावर मालमत्तेची अनुक्रमे विक्री, देणगी व फलोपभोग गहाण यासंबंधी संलेखांवर बसवावयाच्या मुद्रांक शुल्कात, जर असा कोणताही संलेख हा, शहरात स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेच्या संबंधातील असेल तेव्हा, विक्री किंवा देणगीसंबंधीच्या संलेखाच्या बाबतीत, अशा स्थित असलेल्या मालमत्तेच्या मूल्यावर, आणि फलोपभोग गहाणासंबंधीच्या बाबतीत, संलेखात मांडण्यात आलेल्या त्या संलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेवर, एक टक्का या दराने अधिभार आकारण्यात येतो. या अनुषंगाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राज्यातील २८ महानगरपालिकांना देय असलेली १% मुद्रांक शुल्क अधिभारामुळे जमा होणाऱ्या रक्कमेपैकी, **रु. ४२१,७०,००,०००/-** (रुपये चारशे एकवीस कोटी सत्तर लाख फक्त) संबंधित महानगरपालिकांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१% मुद्रांक शुल्कापोटी सन २०२६-२७ करीता अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत महानगरपालिकांना एकूण रक्कम **रु. ४२१,७०,००,०००/-** (रुपये चारशे एकवीस कोटी सत्तर लाख फक्त) आहरित करुन खालीलप्रमाणे वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे:-

सन २०२६-२७ करीता महानगरपालिकांना १% मुद्रांक शुल्कापोटी द्यावयाचे अनुदान

अ.क्र.	महानगरपालिकेचे नाव	सन २०२६-२७ करीता प्रत्यक्षात देय अनुदान
१	२	३
१	नागपूर	१८१९२९७४१
२	चंद्रपूर	६७६८१०९
३	अमरावती	३६७४२१८८
४	अकोला	२६६९७६०२
५	औरंगाबाद	८४८८२४११
६	परभणी	७३१२९४०
७	लातूर	२७६१७९५७
८	नांदेड-वाघाळा	२८९४२९११
९	नाशिक	२१२५६७२७६
१०	मालेगाव	१७०१३९०२
११	धुळे	१०९२१५०८
१२	जळगाव	२२२२३८४७
१३	अहमदनगर	२६२९६३२५
१४	पुणे	१०९५४६४५७०
१५	पिंपरी-चिंचवड	४७७३७३९१८
१६	कोल्हापूर	३४३९५००६
१७	सोलापूर	४३२६६६६७
१८	सांगली	२९०१८०२८
१९	मिरा भाईंदर	१६१३७५२८३
२०	वसई-विरार	१७४७४९०२८
२१	भिवंडी-निजामपूर	२७०२८१५०
२२	उल्हासनगर	१८०५४०४९
२३	कल्याण-डोंबिवली	१७१४६३०७८
२४	ठाणे	९६२६८०७८२
२५	नवी मुंबई	१७४७२९९८०
२६	पनवेल	१४३०२३४९९
२७	जालना	१२१३६३०७
२८	इचलकरंजी	२३२४९३८
	एकुण	**४२१७०००००**

०२. सदर शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या अनुदानातून शासकीय व निमशासकीय संस्थाची येणी-देणी वसूल अथवा समायोजित करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही

करण्यात येईल. तथापि, सदर निधी वितरण हे बिनर्शत स्वरुपाचे आहे. आहरण व सवितंरण अधिकारी यांनी उपरोक्त महानगरपालिकांना एकूण देय **रु. ४२१,७०,००,०००/-** (रुपये चारशे एकवीस कोटी सत्तर लाख फक्त) त्यांच्या DDO खात्यामध्ये आहरित करुन या शासन निर्णयानुसार संबंधित महानगरपालिकांना/नगरपरिषद प्रशासन संचालनालयास/जमेचे लेखाशिर्षामध्ये वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

०३. या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधीचे महानगरपालिकांना वितरण करण्यासाठी सह सचिव, (न.वि.-५), नगर विकास विभाग, यांना नियंत्रक अधिकारी, तसेच, अवर सचिव, (नवि-५) नगर विकास विभाग, यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्यास मंजूरी प्राप्त रक्कम **रु. ४२१,७०,००,०००/-** (रुपये चारशे एकवीस कोटी सत्तर लाख फक्त) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडून त्यांचे डीडीओ बँक खात्यामध्ये आहरीत करून ती तात्काळ संबंधितांकडे वर्ग करावी.

०४. याकरीता होणारा खर्च "मागणी क्रमांक एफ-४, ३६०४, स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे, १०२, मुद्रांक शुल्क (०१) जकात रद्द केल्यामुळे मुद्रांक शुल्काचे अभिहस्तांकन (०१)(०१) स्थानिक संस्था करांऐवजी जकातीचे पुन:स्थापन केल्यामुळे महानगरपालिका क्षेत्रामधील मुद्रांक शुल्कावरील १ टक्के अधिभार महानगरपालिकेसाठी देण्याच्या दृष्टिने (३६०४०९२४) ३१ सहायक अनुदान (वेतनेत्तर)" या लेखाशीर्षाखाली खर्ची घालून तो सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा. तथापि, सदर निधी वितरण हे बिनर्शत स्वरुपाचे आहे.

०५. असे प्रमाणित करण्यात येते की, वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्रमांक-अर्थसं-२०२०/ प्र.क्र. ६४/अर्थ-३, दिनांक १६ एप्रिल, २०२० तसेच, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक-अर्थसं-२०२५/ प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०७ एप्रिल, २०२४ मधील तरतूदीनुसार व वित्त विभागाने त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक. अ.सं. ५००/व्यय-३, दिनांक २६.१०.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६११०६१२१८१२०९२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SACHIN DATTATRAY SAHASRABUDDHE
Date: 2026.11.06 12:18:59 +05'30'

(सचिन द. सहस्त्रबुध्दे)
उप सचिव, नगर विकास विभाग

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. उप मुख्यमंत्री (अल्पसंख्याक,क्रिडा) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

४. मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग,मंत्रालय मुंबई
६. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
७. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर, नवी मुंबई.
८. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
९. सह सचिव, नगरविकास विभाग, (नवि-५)
१०. अवर सचिव, तथा आहरण व संवितरण अधिकारी (नवि-५), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१२. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१५. उप सचिव , कराधान-१ , वित्त विभाग,मंत्रालय मुंबई
१६. वित्त विभाग, व्यय-३ / कोषा प्रशासन-५ / अर्थसं-१६ / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. कार्यासन नवि-४ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. निवड नस्ती (नवि-३२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.